# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.11.2025** **वार- शनिवार**

---

**नवलेपूल उपाययोजना**

नवले पूल परिसरात होत असलेल्या अपघातांच्या घटनांना आळा घालण्यासाठी, कात्रज नवीन बोगदा ते नवले पूल दरम्यान वाहनांचा वेग मर्यादित रहावा, यासाठी 'रम्बल स्ट्रिप' बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे महापालिका अधिकारी आणि पुणे शहर वाहतूक पोलीस यांच्या संयुक्त बैठकीत काल हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आयुक्त नवल किशोर राम यांनी पत्रकार परिषदेत दिली. नवले पूलाजवळ असलेल्या तीव्र उतारामुळे अवजड वाहनांचं वेगावर नियंत्रण राहत नाही. त्यामुळे बहुतांश अपघात होत असल्याचं निदर्शनास आलं आहे. त्यामुळे वाहनांचा वेग नियंत्रित ठेवण्यासाठी या रस्त्यावर पाचशे मिटर अंतरावर रम्बल स्ट्रिप बसविण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचं आयुक्तांनी सांगितलं.

**वाहतूक नियंत्रण**

पुणे शहर वाहतूक विभागानं शहरातील जड वाहतुकीमुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी आणि अपघातांचं प्रमाण कमी व्हावं, तसंच नियमांच काटेकोर पालन व्हावं यासाठी विशेष कारवाई पथकाची स्थापना केली आहे. गेल्या काही दिवसांत या पथकानं बेकायदेशीररित्या शहरात प्रवेश करणाऱ्या तसंच वाहतूक नियमांचं उल्लंघन करणाऱ्या जड वाहनांवर लक्ष ठेवून 20 वाहन चालकांवर कारवाई केली.

**थकबाकी अभय योजना**

पुणे महानगरपालिकेच्या वतीने कर आकारणी आणि कर संकलन विभागामार्फत 15 नोव्हेंबर 2025 ते 15 जानेवारी 2026 या दरम्यान राबविण्यात येणाऱ्या मिळकतकर थकबाकी अभय योजनेची आज उत्साहात सुरुवात झाली.

अभय योजनेमध्ये निवासी, बिगर निवासी आणि मोकळ्या जागा अशा सर्व जवळपास 4 लाख 81 हजार मिळकतींच्या लाभार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. जास्तीतजास्त नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असं आवाहन महापालिका आयुक्त नवल किशोर राम आणि अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी केले आहे.

**दिव्यांग रोजगार मेळावा**

पिंपरी चिंचवड महापालिका दिव्यांग भवन फाउंडेशनच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींसाठी सेन्टर ऑफ एक्सलन्स' अंतर्गत दिव्यांग बांधवांच्या रोजगार मेळाव्याचं काल आयोजन करण्यात आलं होतं. या अंतर्गत दीव्यांग बांधवांचा पहिला रोजगार मेळावा दिव्यांग भवन इथं घेण्यात आला. या रोजगार मेळाव्यासाठी 587 उमेदवारांनी नावनोंदणी केली होती. महापालिकेच्या माध्यमातून दिव्यांग युवकांना योग्य संधी मिळावी यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

**जी.प.बालसाहित्य महोत्सव**

पुणे जिल्हा परिषद आणि अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे यांच्या सहकार्यानं आयोजित दोन दिवसीय बालसाहित्य महोत्सव–2025, बालगंधर्व रंगमंदिर इथं उत्साहात पार पडला. जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांसाठी पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर साहित्य संमेलन घेण्यात आल्यानं हा उपक्रम ऐतिहासिक ठरला. महोत्सवाची सुरुवात 30 शाळांमधील 600 विद्यार्थ्यांच्या भव्य ग्रंथ-दिंडीने झाली. चर्चा, परिसंवाद, काव्यवाचन, यासह जिल्हा परिषद शाळांमधील 1,000

पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी साकारलेल्या साहित्यकृतींचं भव्य प्रदर्शनदेखील याठिकाणी आयोजित करण्यात आलं होतं. विविध प्रकाशनसंस्थांनी या महोत्सवात सहभाग घेत बालसाहित्याचा समृद्ध आणि विस्तृत संग्रह सादर केला

**सखी आंगण**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं आकुर्डी इथं महिला आणि बाल कल्याण योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या खाद्य पदार्थ केंद्रातील 49 गाळ्यांचं महिला बचत गटांना वाटप करण्यासाठी भारतातील पहिला ई- लिलाव घेण्यात आला. या खाद्यपदार्थ केंद्राला ‘सखी आंगण’ हे मराठी नाव देण्यात आलं आहे. हे केंद्र पिंपरी चिंचवड शहरातील महिला बचत गटांमार्फत चालवण्यात येणार आहे.

या विक्री केंद्रातील गाळे महिला बचत गटांना भाडेकराराद्वारे देण्यात आले आहेत. या गाळ्यांपैकी 2 गाळे दिव्यांग महिला बचत गटांसाठी, 1 गाळा तृतीयपंथी गटासाठी, 1 गाळा कोविड योद्धा महिला गटासाठी, 2 गाळे आदिवासी गटांसाठी, 3 गाळे दीनदयाळ अंत्योदय योजनेअंतर्गत गटांसाठी आणि उर्वरित 40 गाळे पीसीएमसी सक्षम अंतर्गत नोंदणीकृत महिला बचत गटांसाठी देण्यात आले.

**कृषी योजना अटी**

कृषी यांत्रिकीकरण आणि राष्ट्रीय कृषी विकास योजनांअंतर्गत निवड झालेल्या शेतकऱ्यांना यंत्रे आणि अवजारांच्या तुटवड्यामुळे खरेदीला होणारा विलंब लक्षात घेऊन 30 दिवसांच्या देयक अपलोड मुदतीची अट शिथिल करण्यात आली आहे. तसंच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे लागू असलेल्या आचारसंहितेच्या कालावधीतही ‘प्रती थेंब अधिक पीक’ या योजनेच्या लाभार्थ्यांना आचारसंहितेपूर्वी पूर्वसंमती देऊन पुढील कार्यवाही करता येईल, असंही कृषी विभागाकडून सांगण्यात आलं आहे.

**संविधानरत्न पुरस्कार**

भारतीय संविधान दिनानिमित्त भारतीय संविधान संवर्धन आणि संरक्षण समितीतर्फे देण्यात येणारा संविधानरत्न पुरस्कार, संविधानाच्या अभ्यासिका सुषमा अंधारे आणि संविधानाचे प्रचारक सुशील बोबडे यांचा जाहीर झाला आहे. येत्या गुरुवारी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते या पुरस्कारांचं वितरण होणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 29 तर किमान तापमान 11 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**